बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०२ | अंक -१३९ | सोमवार दि.०३ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रु | पाने ४

Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-02 | Issue -139 | MONDAY DT.03 FEBRUARY 2025 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

MO.9860898564

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक - दिपक थोरात

### मटका व्यवसायाच्या हप्त्याचे 'पोलिसी गणित' कोणासाठी?

दररोज लाखो रुपयांचा हप्ता हा मटका व्यवसायातून गोळा केला जातो. या पैशांचा वाटा कोणाला जातो? कोणत्या वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत हा पैसा पोहोचतो? या सगळ्या आर्थिक व्यवहाराची चौकशी होण्याची गरज आहे, असे नागरिकांचे मत आहे.

### बीडच्या जनतेची मागणी - मटका माफियांवर कठोर कारवाई करा!

एस. पी. नवनीत कॉवत यांच्या नियुक्तीनंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीला चाप बसला आहे, पण मटका व्यवसाय मात्र अद्याप खुलेआम सुरू आहे. बीड शहरातील शिवाजीनगर, बीड ग्रामीण, बीड शहर, पेठ बीड, तसेच ङउइ हद्दीत मटका, गुटखा आणि पत्त्यांचे क्लब सर्रास सुरू असल्याचे दिसून येते.मटका व्यवसायातील मोठ्या हस्तींना अभय देणाऱ्या पोलिसांवर कारवाई करावी, त्यांची तातडीने बदली करावी, आणि मटका माफियांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. वाळू माफियांची रांग लावल्याप्रमाणे, मटका माफियांनाही एसपी कार्यालयात हजर करून त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.



# बीडमध्ये मटका माफियांना अभय का?

## नागरिकांचा एस. पी. नवनीत कॉवत यांना सवाल




बीड/प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात पोलीस अधीक्षक (एस. पी.) नवनीत कॉवत यांनी वाळू माफियांवर कठोर कारवाई करत त्यांची रांग लावली होती. मात्र, याच जिल्ह्यात मटका माफियांवर अद्याप ठोस कारवाई होताना दिसत नाही. हजारो मटका बुकी रिक्षरोसपणे सुरू असून, त्यावर नियंत्रण ठेवण्यास पोलीस प्रशासन अपयशी ठरत असल्याचे आरोप होत आहेत.

मटका व्यवसायाला पोलिसांचे अभय?

बीड जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या हद्दीत मोठ्या प्रमाणावर मटका बुकी सुरू आहेत. कोट्यवधी रुपयांची उलाढाल या बेकायदेशीर धंद्यातून होत असून, स्थानिक पोलीसच त्यावर कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचा आरोप होत आहे. अनेक पोलिसांचे मटका माफियांशी साटेलोटे असल्याची चर्चा आहे.

पोलीस आणि मटका माफियांमध्ये व्हॉट्सअॅप कॉलिंग, हॉटेल-धाब्यांवर एकत्र जेवण, वाढदिवस साजरे करणे अशा स्वरूपाचा संबंध असल्याचे बोलले जात आहे. परिणामी, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांना खरी माहिती मिळत नाही, आणि काही पोलीस अधिकारी-कर्मचारीच त्यांना अंधारात ठेवत असल्याचा संशय व्यक्त होत आहे.

### पोलीस ठाण्यांतच मटका माफियांची पकड?

बीड जिल्ह्यातील अनेक पोलीस अधिकारी आणि कर्मचारी दीर्घ काळापासून एकाच पोलीस ठाण्यात तळ ठोकून बसले आहेत. स्थानिक गुन्हे शाखेत काही अधिकारी वर्षानुवर्षे टिकून असून, त्यांचा या बेकायदेशीर धंद्यांशी संबंध असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. विधान परिषदेत आमदार सुरेश धस यांनीही यासंदर्भात आवाज उठवला आहे.

# बीड जिल्ह्यातील २४ सरपंच, ८२० सदस्यांचे सदस्यत्व रद्द

## गावगाडा चालवणाऱ्या लोकप्रतिनिधींना जिल्हाधिकाऱ्यांचा दणका

**बीड जिल्ह्यात गाव गाड्याचा कारभार चालवणाऱ्या सरपंचाला आणि सदस्याला जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी चांगलाच दणका दिला आहे. आत्तापर्यंत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी २४ सरपंच आणि ८२० सदस्य यांचे सदस्यत्व रद्द केल्याची माहिती पुढे आली आहे.**

**जातवैधता प्रमाणपत्र वेळेत सादर न केल्याने जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी २० जानेवारी रोजी जिल्ह्यातल्या सात तालुक्यातील १३ सरपंच, तर ४१८ सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले होते. त्यानंतर आता पुन्हा कारवाई करत चार तालुक्यातील ११ सरपंच आणि ४०२ सदस्यांचे सदस्यत्व रद्द केले आहे. त्यामुळे आत्तापर्यंत २४ सरपंच आणि ८२० सदस्यांचे सदस्यत्व रद्द झाले आहे.**

जिल्ह्यातील २४ सरपंच, ८२० सदस्यांचे सदस्यत्व रद्द, नेमकं कारण काय?

पुढे आलेल्यामाहितीनुसार, २०२० ते २५ या कालावधीत झालेल्या सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर केले नाहीत. अनुसूचित जाती अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीच्या राखीव असलेल्या जागांवर निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र निवडून आलेल्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. मात्र हे प्रमाणपत्र सादर न केल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी ही कारवाई केली आहे. त्यामुळे गावगाडा चालवणाऱ्या लोकप्रतिनिधींना जिल्हाधिकाऱ्यांनी चांगलाच दणका दिल्याचे बोलले जात आहे.






### जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्याने कारवाईचा बडगा

गेल्या काही दिवसांपासून चर्चेच्या केंद्रस्थानी असलेल्या बीड जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांकडून सरपंच आणि ग्रामपंचायतींच्या सदस्यांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. २४ सरपंच आणि ८२० सदस्य यांचे सदस्यत्व रद्द केलंय. यापूर्वी ही जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी आष्टी, अंबाजोगाई, वडवणी, पाटोदा, माजलगाव, केज आणि धारूर तालुक्यातील ४१३ ग्रामपंचायत सदस्य आणि १३ सरपंचाचे सदस्य रद्द केले होते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती नागरिकांचा मागास प्रवर्गासाठीच्या राखीव असलेल्या जागांवर निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीस जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र निवडून आलेल्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. मात्र २०२० पासून पुढे झालेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक व पोटनिवडणुकीमध्ये राखीव प्रवर्गातून निवडून आलेल्या अनेक सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्याने त्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे.

# फरार आरोपीने जर पुरावे नष्ट केले तर जबाबदारी प्रशासनाची

## त्यासाठीच तो फरार, आम्हाला फक्त न्याय हवा - धनंजय देशमुख

बीड - पुरावे नष्ट करण्यासाठीच गेली दोन महिने आरोपी फरार आहे. यात जर काही पुरावे नष्ट करण्यात आले तर त्यांची जबाबदारी ही यंत्रणे आणि प्रशासनाची असेल असे धनंजय देशमुख यांनी म्हटले आहे.आमचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर पूर्ण विश्वास त्यांनी आम्हाला न्याय द्यावा.

धनंजय देशमुख पुढे बोलताना म्हणाले की, आम्ही कालच महंत नामदेव शास्त्री यांची भगवानगडावर जात भेट घेतली. आमच्या गावात दोन टक्क्यांहून कमी गुन्हेगारी असल्याने आमच्या संपूर्ण गावाला पोलिसांकडून प्रमाणपत्र भेटले आहे. हे पहिलेच मोठे प्रकरण आहे. यामुळे गावाला राजकारणाचा काय अनूभव असणार आहे.

धनंजय देशमुख म्हणाले की, संतोष देशमुख यांना न्याय मिळावा यासाठी आमच्यासोबत जी लोकं आहेत, त्यांना या राजकारणाचा अनुभव आहे. म्हणून विचारपूर्वक हे वक्तव्य केले असणार, असे त्यांनी लोकप्रतिनिधींकडून धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या मागणीवर बोलताना म्हटले आहे. तर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आमचा विश्वास आहे, त्यांनी या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेत जबाबदारी घेत आम्हाला न्याय द्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

देशमुखांनी मांडला गुन्हेगारांचा कच्चाचिठ्ठा

नामदेव शास्त्रींची भेट घेत धनंजय



देशमुखांनी सांगितले की, देशमुख कुटुंबाने जातीवाद केला असता तर त्यांच्या हत्येनंतर दिसले असते. माझा भाऊ दलित बांधवाला वाचवण्यासाठी गेला होता. आमची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. आरोपींवर आतापर्यंत अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत. आरोपींची मानसिकता तपासण्याची गरज आहे. ज्याला आरोपींची बाजू घ्यायची त्यालाच जातीयवादाचा अंश येत आहे. आम्ही सर्व दाखवले आहे. यांच्या कार्यालयात बसायचे. त्यांच्या गाडीत फिरायचे. संतोष देशमुख यांची अतिशय क्रूर हत्या झाली आहे. प्रत्येक क्षेत्रातील लोक आपल्यासोबत आहे. राजकीय नेते, संप्रदायाचे लोक, सामाजिक कार्यकर्ते, आमच्यासोबत आहेत. न्यायाच्या भूमिकेत आहेत.

# अंतरवलीत राज पाटील यांनी केले वृक्ष पुस्तक आणि प्रशस्तीपत्र वाटप

## मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी उपोषण सोडल्यानंतर राबवला उपक्रम

**प्रतिनिधी** । वडवणी

मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी मराठ्यांच्या न्याय हक्कासाठी सहा दिवस उपोषण केल्यानंतर त्यांच्या बहुतांशी मागण्या शासनाने मान्य केल्या त्यामुळे जरांगे पाटलांनी उपोषण स्थगित केले उपोषण स्थगित केल्यानंतर जरांगे पाटील यांचे सहकारी ड राज पाटील यांच्या वतीने सर्व उपोषण कर्ते आणि आंदोलनातील सहभागी मावळ्यांना पुस्तक झाड आणि प्रशस्तीपत्र देऊन मनोज दादा यांचे सहकारी प्रदीप दादा सोळंके यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

मराठा योद्धा मनोज दादा जरांगे पाटील हे मागील अनेक वर्षापासून मराठ्यांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करत आहेत. त्यांच्या या संघर्षामध्ये मागील अनेक वर्षांपासून अनेक सहकारी काम करतात त्या सहकार्यामध्ये एडवोकेट राज पाटील हे सुद्धा एक महत्त्वाचे सदस्य आहेत. राज पाटलांनी जरांगे पाटलाच्या प्रत्येक आंदोलनामध्ये सक्रिय सहभाग घेतलेला आहे. जरांगे पाटील मागील अनेक वर्षापासून ज्या ज्या ठिकाणी उपोषणे आंदोलने करतात त्या त्या ठिकाणी राज पाटील यांनी आंदोलनामध्ये सहभाग तर



घेतलाच याशिवाय त्या ठिकाणी आलेल्या लोकांना झाड पुस्तकाने तसेच प्रशस्तीपत्र वाटप केलेले आहेत. साष्ठपिंपळगाव, वडीकाळा, भांबेरी या ठिकाणीही त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेऊन हा उपक्रम राबवलेला होता. जरांगे पाटील यांच्या प्रत्येक आंदोलनामध्ये राज पाटलांच मोठं योगदान लाभलेला आहे. या आंदोलनात देखील राज पाटील यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह पूर्ण वेळ सहभाग नोंदवला तसेच आलेल्या सर्व आंदोलन कर्त्यांना झाड पुस्तक प्रशस्तीपत्र देऊन जरांगे पाटील यांची ज्येष्ठ सहकारी प्रदीप दादा सोळंके यांच्या हस्ते त्यांचा गौरव केला. जरांगे पाटील यांचं आयुष्य मराठ्यांच्या भवितव्यासाठी गरजेचे आहे. यासाठी सर्व मराठ्यांनी त्यांना साथ देणे गरजेचे आहे अशा भावनाही राज पाटील यांनी व्यक्त केल्या.

### २३ वर्षापासून अविरत काम

राज पाटील हे मागील २३ वर्षापासून सामाजिक क्षेत्रामध्ये काम करत आहेत. लढा दुष्काळाशी फाउंडेशनच्या माध्यमातून त्यांनी आतापर्यंत लाखो झाडांचे वाटप केले आहे. मराठा आरक्षण लढ्यामध्ये त्यांनी स्वतःला झोकून दिलं आहे. जरांगे पाटील यांच्या आंदोलनामध्ये मागील पाच वर्षापासून ते सक्रिय सहभागी आहेत. जरांगे पाटील यांच्यासारखा तरुण कार्यकर्ता मराठा समाजासाठी प्राणाची बाजी लावून काम करत आहे. त्यांच्या पाठीमागे समस्त समाजाने उभा राहिले पाहिजे. जरांगे पाटलांच्या आंदोलनामुळे समाजाचे कल्याण होत असेल तर मी त्यांच्या पाठीमागे कायम उभा आहे. असं त्यांनी मागील

**चार वर्षांपूर्वीच आपल्या भाषणातून सांगितलं होतं.प्रदीप दादा यांनी केलं कौतुक मनोज दादा जरांगे पाटील यांचे ज्येष्ठ सहकारी आणि सर्व मराठा बांधवांचे मार्गदर्शक प्रदीप दादा सोळंके यांनी राज पाटील यांच्या या उपक्रमाचे कौतुक केले आहे. राज पाटील हे सामाजिक क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम करत असून मराठा समाजासाठीही त्यांची मोठी तळमळ आहे असेही गौरवोद्गार त्यांनी काढले.**



# बाबुराव आडे यांचा सेवागौरव सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी** । अंबाजोगाई

येथील भा.शि.प्र.संस्था संचलित खोलेश्वर मा. विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा कार्यकारिणी सदस्य बाबुराव आडे हे शासकीय वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले.त्यांच्या सेवेचा यथोचित गौरव खोलेश्वर विद्यालयाच्या वतीने उत्साहात संपन्न झाला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, संचालिका डॉ.कल्पना चौसाळकर, उमेश जगताप, उपमुख्याध्यापक विवेक जोशी, सत्कारमुर्ती आडे, त्यांचे कौटूंबिक सदस्य उपस्थित होते. बाबुरावआडे यांनी आपल्या सेवाकालात संस्थेतील तसेच संस्कार केद्रांतील विविध जबाबदाऱ्या सक्रियपणे सांभाळल्या. तसेच सहकारी व संस्थेविषयी स्नेहभाव जोपासून तळमळीने कार्य केले एक उत्तम प्रशासक कसा असावा याचे उदाहरण म्हणजे बाबुराव आडे आहे तो आदर्श इतरांनी घ्यावा असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या सेवेचा यथोचित सपत्नीक गौरव करण्यात आला. उपस्थितांचे स्वागत प्रशांत पिंपळे, मोरेश्वर देशपांडे, राजेंद्र कुलकर्णी, लक्ष्मण काटे, सपना डुकरे, कुसूमावती बडेराव, वर्षा मुंडे यांनी केले प्रास्तविक सुर्यकांत उजगरे यांनी, संचालन राजेंद्र शेप परिचय श्रीकांत काळे सन्मानपत्र वाचन हनुमंत कस्पटे,आभार श्रीकांन देशपांडे, कल्याणमंत्राचे गायन किशोरी कुलकर्णी हिने केले यावेळी शिक्षक कर्मचारी इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पत्रकारांच्या प्रश्नासाठी पुन्हा रस्त्यावर उतरुन आंदोलन करणार

## मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांचा इशारा, सेलू येथे आदर्श जिल्हा, तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी** । सेलू

’पत्रकारांच्या प्रश्नासाठी मराठी पत्रकार परिषदेने सातत्याने पाठपुरावा केला. पत्रकारांच्या संरक्षणासाठी कायदा व्हावा, यासाठी रस्त्यावर उतरून आंदोलने केली. अखेर सरकारने २०१७ मध्ये पत्रकार संरक्षण कायदा केला. पण प्रत्यक्षात या कायद्याची अंमलबजावणी होत नाही. कारण या कायद्याचे नोटिफिकेशन निघाले नाही. पत्रकार संरक्षण कायद्यासह सरकार पत्रकारांच्या इतर प्रश्नांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. त्यामुळे आता पुन्हा एकदा मराठी पत्रकार परिषद राज्यभर रस्त्यावर उतरून पत्रकारांच्या विविध प्रश्नांसाठी आंदोलन करणार आहे,’ असा इशाराच परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी दिला.

मराठी पत्रकार परिषद आयोजित रंगाअण्णा वैद्य आदर्श जिल्हा व वसंतराव काणे आदर्श तालुका पत्रकार संघ पुरस्कार वितरण सोहळा व अध्यक्षांचा मेळावा परभणी जिल्ह्यातील सेलू येथे एस.एम.देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडला. यावेळी देशमुख बोलत होते. याप्रसंगी परिषदेचे विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, प्रमुख वक्ते तथा प्रसिद्ध निवेदक विशाल परदेशी, स्वागताध्यक्ष विनोद बोराडे, परिषदेचे कार्याध्यक्ष शिवराज काटकर, सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे, कोषाध्यक्ष मन्सूर शेख, राज्य प्रसिद्धीप्रमुख संदीप कुलकर्णी, सह प्रसिद्धीप्रमुख भरत निगडे, महिला आघाडी अध्यक्षा शोभाताई जयपूरकर, डिझिटल मीडिया प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, परिषदेचे उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, विभागीय सचिव रवी उबाळे, सचिन शिवशेट्टे, अशोक काकडे, उप विभागीय अधिकारी

संगीता सानप,माजी नगराध्यक्ष हेमंत आढळकर, परिषदेचे परभणी जिल्हाध्यक्ष प्रभू दिपके, परभणी जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास, सेलू तालुका पत्रकार संघ अध्यक्ष लक्ष्मण बागल यांच्यासह राज्याच्या विविध भागातून आलेले पत्रकार उपस्थित होते.’राज्य सरकारने पत्रकारांसाठी पेन्शन योजना सुरू केली. आरोग्य योजना सुरू केल्या. पण प्रत्यक्षात या योजनांचा




लाभ घेताना अनेक अडचणी येत आहेत,’ असे सांगतानाच देशमुख म्हणाले, ’समाजाच्या पत्रकारांकडून १०० अपेक्षा करतात. पण अडचणीच्या वेळात समाजाने देखील पत्रकारांच्या पाठीशी उभे राहावे, अशी अपेक्षा असते. मात्र पत्रकाराच्या अडचणीच्या काळात कोणी उभे राहत नाही. पण यापुढे महाराष्ट्रातील एकही पत्रकार एकाकी पडणार नाही, यासाठी मराठी पत्रकार परिषद काम करीत आहे. तशी रचनाच आपल्या संघटनेची आहे. मराठी पत्रकार परिषद ग्रामीण भागात पुरस्कार वितरण सारखे उपक्रम घेण्यामागे मोठा उद्देश आहे. कारण ग्रामीण जीवन, संस्कृती, प्रश्न यासर्वाची जाण पत्रकारांना होणे महत्त्वाचे आहे. राज्यातील ३५६ तालुक्यात आपल्या परिषदेचे अस्तित्व आहे. सामाजिक बांधीलकी जपत परिषद काम करीत आहे. पण ग्रामीण भागातील पत्रकारांचे प्रश्न तितक्याच ताकतीने मानण्याचे काम आता करणे गरजेचे असून याबाबत लवकरच परिषद भूमिका जाहीर करेल,’ असेही देशमुख यांनी सांगितले.

देशमुख पुढे म्हणाले, ’पत्रकार अधिस्वीकृतीचे नियम ग्रामीण भागातील पत्रकारांसाठी खूप कडक आहे. याबाबतीत विचार करण्याची वेळ आली आहे. त्यामुळेच पत्रकारांच्या हक्काची चळवळ पुढे नेण्यासाठी आगामी काळात अधिक व्यापकतेने, जोमाने परिषद काम करेल,’ असेही देशमुख यांनी स्पष्ट केले.

पत्रकारिता क्षेत्रात काम करताना माणसे जोडा

याप्रसंगी उपस्थित असलेले प्रमुख पाहुणे विशाल परदेशी यांनी पत्रकारिता क्षेत्रात काम करताना माणसे जोडा,’ असा मोलाचा सल्ला देत सांगितले की, ’आजच्या कार्यक्रमाला उत्तर महाराष्ट्र, कोकण, मध्य महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा अशा विविध भागातून पत्रकार आलेत. मराठी पत्रकार परिषद या मातृसंस्थेच्या एक भाग आहे, याचा मला अभिमान आहे. ग्रामीण भागातील पत्रकाराकडे जेवढी माहिती असते, तेवढी शहरी भागातील पत्रकारांना नसते. चांगला फिल्ड रिपोर्टर हा उत्तम अँकर होऊ शकतो. बेधडकपणे व्यक्त होण्यास प्राधान्य द्या. असे बोला जे तुमच्या आईला समजेल, असे प्रश्न विचारा जे तुमच्या आईला समजतील. आयुष्यात आपल्याला जमिनीवर आणणारी माणसे असावीत. तरच माणूस माणसात जाऊन उत्तम मिसळू शकेल. पत्रकारिता क्षेत्रात प्रत्येक क्षण स्पर्धेसारखा असतो, आणि या स्पर्धेत आपण टिकणे गरजेचे आहे. पण आपण कोणतीही बातमी देताना शब्दांचे भान फार महत्त्वाचे आहे. घरातील महिला जेव्हा घर सांभाळते, तेव्हाच पत्रकारीतेचे व्यसन पूर्ण होऊ शकते. तसेच पत्रकारिता करताना आरोग्य जपणे महत्त्वाचे आहे. ब्रेकिंग न्यूज मिळवण्याच्या नादात नाही ते धाडस ते करू नका. धाडस कोणत्या गोष्टीचे करावे, हे देखील समजून घेणे गरजेचे आहे. स्वतः ला जपा, कुटुंबाला जपा.कारण आपले कुटुंब आहे तरच आपण आहोत,’ असेही परदेशी यांनी सांगितले.मिलिंद अष्टीवकर म्हणाले की,’मराठी पत्रकार परिषद १०० वर्षाकडे वाटचाल करीत आहे. पत्रकारांसाठी ग्रामीण भागात कार्यक्रम घेतल्याने तेथील पत्रकारांना एक बळ मिळते.’

राज्यभरातून आलेल्या पत्रकारांचे स्वागत याप्रसंगी स्वागताध्यक्ष विनोद बोराडे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परभणी जिल्हा सरचिटणीस मोहम्मद इलियास यांनी तर सूत्रसंचालन सुभाष मोहकरे यांनी केले. आभार रेवणआप्पा साळेगावकर यांनी मानले.

# बीड येथे शेल एनएक्सप्लोरर्सचे एक दिवसीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण संपन्न

**प्रतिनिधी** । बीड

लर्निंग लिंक्स फाउंडेशनच्या आयोजनाखाली शेल एनएक्सप्लोरर्स या अटल टिंकरींग लॅब संबंधित शिक्षकांचे दि. ३० जानेवारी रोजी एक दिवसीय प्रशिक्षकांचे प्रशिक्षण यशस्वीरीत्या संपन्न झाले. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. गटशिक्षणाधिकारी बीड, श्री. समंदर खान यांनी केले तर प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षण विस्तार अधिकारी श्री. माटे व श्री. मोमीन हे उपस्थित होते. श्री. समंदर खान यांनी त्यांच्या शुभेच्छापर संदेशात सदरील प्रशिक्षाच्या माध्यमातून अटल टिंकरींग लॅब संबंधित विद्यार्थ्यांना प्रकल्प निर्मितीत जास्तीत जास्त मदत होईल व शेल नेक्सप्लोरर मेथडॉलॉजीमुळे शिक्षकांसह विद्यार्थ्यांना नवीन संकल्पनावर आधारित प्रकल्प निर्मीतीसाठी मोलाची मदत ठरू शकते असा विश्वास व्यक्त केला. या कार्यक्रमात मुंबई तसेच बेंगलोर येथील प्रशिकांनी अन्न, पाणी आणि ऊर्जा शास्वतेशी संबंधित महत्वाच्या समस्यांवर नाविन्यपूर्ण दृष्टीकोनातून उपाय शोधण्यासाठी सहभाग घेतला.

शेल एनएक्सप्लोरर हा जागतिक स्तरावर राबवला जाणारा कार्यक्रम आहे, जो बीड जिल्ह्यातील शिक्षकांना सिस्टम



थिंकिंग आणि डिझाईन थिंकिंग या संकल्पनांचे प्रशिक्षण देत आहे. या प्रशिक्षणा दरम्यान शिक्षकांना प्रकल्प विकासाच्या प्रक्रियेत सखोल समज देण्यात आली. यामध्ये वास्तव समस्यांसाठी शाश्वत उपाय शोधण्यावर भर दिला गेला या कार्यशाळांमुळे सहभागी शिक्षकांना गंभीर विचार करण्यास प्रभावी सहकार्य करण्यास आणि त्यांच्या समुदायांमध्ये सकारात्मक बदल घडवणारे प्रकल्प तयार करण्यास प्रोत्साहन मिळाले.

शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि शाळेतील नाविन्यपूर्ण विचारांची वाढ करणाऱ्या या प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले या प्रशिक्षणामुळे विचार करण्याची नवी दृष्टी मिळाली आहे हे केवळ गुंतागुंतीच्या समस्यांचे निराकरण समजून घेण्यास मदत करत नाही तर विद्यार्थ्यांना प्रभावी उपाय विकसित करण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी संधी देखील देते असे एका सहभागीने सांगितले.

लर्निंग लिंक फाउंडेशनच्या सहकार्याने शेल एनएक्सप्लोरर्स कार्यक्रम शाश्वतता आणि नाविन्य याविषयाची आपली बांधिलकी अधिक दृढ करत आहे असे कार्यक्रम शिक्षकांना सशक्त बनवून पुढील पिढीला शाश्वत आणि समृद्ध भविष्यकाळासाठी तयार करण्याचे काम करत आहेत.

# आदित्य ग्रीन कंपनीचे लाड पुरवणे कलेक्टर अविनाश पाठक साहेबांनी बंद करावे –लोक जनशक्ती पार्टी




**प्रतिनिधी** । अंबाजोगाई

अंबाजोगाई तालुक्यातील मौजे जवळगाव येथील गट नंबर २११ मधील गायरान धारकाच्या ताब्यातील जमिनीवर आदित्य ग्रीन कंपनीतील सौर ऊर्जा प्लांट शासनाला चुकीची माहिती देऊन मंजूर करून घेण्यात आला तो झालेला करार रद्द करावा यासाठी येथील २५ कुटुंब बेमुदत धरणे आंदोलनाला बसले आहेत जवळगाव येथे जवळपास दोनशे एकर गायरान आहे व ५०० एकर देवीची शासकीय जमीन आहे या जमिनी सोडता फक्त २० एकर येथे २५ कुटुंब या जमिनीवर आपला उदर निर्वाह करतात परंतु येथील तलाठी व मंडळ अधिकारी यांनी पाच वर्षांपूर्वी शासनाला संबंधित जमीन ही पडीक असल्याचा खोटा अहवाल देऊन शासनाला फसवले व या अहवालाची कसलीच शहानिशा बीड जिल्ह्याचे कलेक्टर श्री अविनाशजी पाठक साहेब यांनी न करता आदित्य ग्रीन कंपनीला संबंधित दलितांचे गायरान दिले यामुळे येथील शेकडो कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे यामुळे येथील २५ कुटुंब गेल्या पाच दिवसांपासून २९/१/२०२५ पासून बेमुदत धरणे आंदोलनाला बसले आहेत तरीही येथील दलित कुटुंबाला न्याय मिळावा म्हणून आज दिनांक ०२/०२/२०२५ रोजी लोक जनशक्ती पार्टीच्या वतीने व भीमशक्तीच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला प्रशासनाने याची लवकरात लवकर योग्य ती कारवाई करावी अन्यथा ९ तारखेनंतर जे काही पडसाद उमटतात त्याचे सर्व जबाबदारी प्रशासनाचे राहील

# प्रधानमंत्री आवास योजनेतील पात्र नागरिकांनी योजनेचा लाभ घ्यावा:– सचिन शिंदे

**प्रतिनिधी** । नेकनुर

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) टप्पा दोन या योजनेसाठी नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले असून बीड तालुक्यासाठी नेकनूर ग्रामपंचायत अंतर्गत नागरिकांच्या घरकुलांचे नवीन उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे नेकनुर येथील नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केले आहे.



स्वतःचे पक्के घर नसलेल्या नेकनूर,सावंतवाडी,वैतागवाडी येथील नागरिकांना भरघोस उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. त्यामुळे जास्तीत पात्र ठरलेल्या व यादीत नाव आलेल्या कुटुंबांनी आपले प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह ग्रामपंचायत मार्फत दाखल करून या योजनेचा लाभ घ्यावा.तसेच प्रधानमंत्री आवास योजना प्रक्रिया पारदर्शक व्हावी व नागरिकांना यासंदर्भात कसल्याही प्रकारची गैरसोय झाल्यास किंवा आर्थिक मागणी झाल्यास त्यांनी ग्रामपंचायत कार्यालय येथे तक्रार करावी असे आवाहन नेकनूर चे उपसरपंच सचिन शिंदे यांनी केले आहे.

## धारुर नगरपरीषदेच्या स्वच्छता सर्वेक्षण चित्रकला स्पर्धेत जनता प्राथमिक विद्यालयचे घवघवीत यश

**प्रतिनिधी ।** धारूर



स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत नगर परिषद किल्लेधारूर मुख्याधिकारी महेश गायकवाड यांच्या पुढाकारातून स्वच्छ सर्वेक्षण पंधरवाडा अंतर्गत चित्रकला व टाकाऊ पासून टिकाऊ ही स्पर्धा अ गट पहिली ते पाचवी आणि ब गट सहावी ते दहावी अशी घेण्यात आली .चित्रकला स्पर्धेत ब गटात जनता प्राथमिक विद्यालयाचा विद्यार्थी प्रथमेश नवनाथ गरड यांस प्रथम क्रमांकांचे रोख पारितोषिक २००१ रुपये मिळाले . तसेच उत्तेजनार्थ अश्लेषा सोळुंखे ,स्वप्नाली पांचाळ, सोहम शिनगारे, कल्याणी भैरे ,पायल शिनगारे, जान्हवी पांचाळ, प्राजक्ता तपसे. यांना शैसाहित्य देण्यात आले .

त्याच्या या यशाबद्दल शाळेचे मु .अ .विश्वास शिनगारे मार्गदर्शक कलाशिक्षक अर्जुन भालेराव , जयश्री शिंदे व्हि बी भनगे,क्राती कदम, एस एन. गवळी,बी आर रुद्रे , एस आर धरपडे डि व्ही चोले , जे टी शिंदे, व्हि बी कांबळे यांनी कौतूक केले.

## मा.खा.प्रितमताई मुंडे यांच्या उपस्थितीत बीड येथे गुरुवारी घरेलु कामगार महिलांचा स्नेह मेळावा

**प्रतिनिधी ।** बीड

**बीड तालुक्यातील सर्व घरेलू कामगार महिलांनी उपस्थित रहावे**
**श्री.दादासाहेब नन्नवरे प्रदेश सरचिटणीस भाजपा कामगार मोर्चा महाराष्ट्र**

भाजप प्रदेश उपाध्यक्ष तथा मा.खा.प्रितमताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड येथे गुरुवार दि ६ फेब्रुवारी सायंकाळी ४ वा गोल्डन चॉईस हॉटेल बार्शी रोड येथे घरेलु कामगार महिलांचा स्नेह मेळावा आयोजित केला असल्याची माहिती भाजच कामगार मोर्चाचे प्रदेश सरचिटणीस श्री. दादासाहेब नन्नवरे व ओमप्रकाश गिरी जिल्हा अध्यक्ष भाजपा कामगार मोर्चा जिल्हा अध्यक्ष यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.



प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की बीड तालुक्यातील घरेलु कामगार महिलांना या मेळाव्यात कामगार नोंदणी प्रमाणपत्राचे वाटप भाजप प्रदेश उपाध्यक्ष मा.खा.प्रितमताई मुंडे,भाजप भाजप प्रदेश सचिव मराठवाडा सदस्य नोंदणी प्रमुख श्री किरण पाटील जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचे हस्ते वाटप करण्यात येणार असून या नोंदणी प्रमाणपत्र मुळे या महिलांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ होणार आहे गुरुवार दि ६ फेब्रुवारी रोजी हॉटेल गोल्डन चॉईस बार्शी रोड येथे होणाऱ्या या महिला मेळाव्याला मा.खा.प्रितमताई मुंडे भाजप प्रदेश सचिव तथा मराठवाडा नोंदणी प्रमुख श्री किरण पाटील बीड भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख सरचिटणीस ड.सर्जेराव तांदळे बीड जिल्हा बँक अध्यक्ष अदित्यजी सारडा,अशोकजी लोढा जिल्हा परीषद सदस्य,बीड जिल्हा सदस्य नोंदणी प्रमुख नवनाथ शिराळे,

उषाताई मुंडे बीड जिल्हा अध्यक्ष महिला मोर्चा उपस्थित राहणार असून या वेळी मकरसंक्रांती निमित्त स्नेहमिलन व तिळगुळ समारंभ संपन्न होणार आहे त्याच प्रमाणे भारतीय जनता पार्टी सदस्य नोंदणी अभियान होईल बीड तालुक्यातील महिलांनी मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहण्याचे आवाहन श्री.दादासाहेब नन्नवरे यांनी केले आहे.

# तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत रमाई आवास घरकुल योजनेचा पैसे वाल्याला लाभ

**एकाच व्यक्तीच्या घरात पाच ते सात घरकुल**

**गरिबाला लाथा, पैसेवाल्याला माथा. घरकुल बटईमुळे खरे लाभार्थी वंचित**

**प्रतिनिधी ।** तलवाडा

गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायत गेल्या पाच वर्षापासून कुठल्या ना कुठल्या कारणामुळे चर्चेत येत असून यामध्ये सरपंच व सदस्य मध्ये नेहमी गेल्या पाच वर्षापासून जमत नसल्यामुळे गावातील विकास अशा अनेक तक्रारी झाल्या असून बोगस कामाचा तर चक्क कळस घाट ला असून त्यात तर आता गोरगरिबाला जनतेला हक्काचे घर मिळावे म्हणून शासनाकडून वेगवेगळ्या घरकुल योजनेतून विविध जाती धर्मासाठी योजना राबवल्या जात असून अशीच रमाई आवास योजना कसल्याही प्रकारची खातर जमा न करता जो दाम देईल त्यालाच घरकुल असे राज रोज पणे चालू असून मागासवर्गीयासाठी येणारे रमाई आवास योजना सरपंच मुळे पैसेवाल्याच्या योजनाही घरात जात असून यामुळे खऱ्या लाभार्थ्यातून रोष व्यक्त होत असून याकडे माजी आमदार अमरसिंह पंडित साहेब यांनी स्वतः जातीने लक्ष दिल्यास या योजनेचा लाभ नक्कीच खऱ्या लाभार्थ्याला मिळेल

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा या गावात घरकुल योजना आल्यास ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांमध्ये नेहमी वाद होत असतो मला एवढे हवे असे म्हणत गेल्या वर्षी मागासवर्गीय समाजासाठी रमाई घरकुल योजनेचे २५ घरकुलाचे उद्दिष्ट आले होते मात्र सरपंच व सदस्यांमध्ये बटईमुळे हे उद्दिष्ट त्यांच्या दिरंगाईमुळे रद्द झाले होते यावर्षी आता नवीन ३९ चे उद्दिष्ट आले असून पहिले २५ चे त्यांना प्राधान्य असून आता नवीन १४ घेण्यात येणार असून यामध्ये सर्वच बोगस लाभार्थी असून सर्वांनीच आपापल्या मर्जीतील लोक घेतले असून ज्यांना अक्षरश घरच नाही असे लाभार्थी पाच वर्षापासून वंचित असून ही



गोरगरिबाची योजना जो दाम देईल त्यांनाच मिळत असून एका घरकुलाचा रेट दहा ते पंधरा हजार असून जो पैसा देईल त्यालाच घरकुल असे तलवाडा ग्रामपंचायत अंतर्गत चालू असून सर्वजण आपापला हिस्सा घेण्यास व्यस्त असून त्यात एकाच पी टी आर वर वडिलाला लाभ दाम दिल्यास त्याच पी टी आर वर आईला लाभ पुन्हा नवीन घरकुल आल्यास त्याच पी टी आर वर मुलांना लाभ पुन्हा भावाला लाभ अशी मर्जीतील लोक घेत असल्यामुळे एकाच घरात असा फायदा होत असून गरीब मात्र मातीच्याच घरात राहत आहे एवढेच नाही तर आलिशान इमारतीवाल्यांना देखील याचा लाभ देण्यात येत असून सरपंचा विषयी गावकऱ्यातून रोष व्यक्त केला जात आहे याकडे शब्द पाळणारा नेता म्हणून आज यांची तालुक्यात ओळख आहे असे अमरसिंह पंडित साहेब यांनी स्वतः रमाई आवास घरकुल योजना लक्ष घालून गरिबातल्या गरीबाला याचा लाभ देण्यात यावा अशी मागणी वंचित लाभार्थ्याकडून होत आहे

किसनाबाई करडे यांना वयाच्या ७५ वर्षीही कसलाही लाभ नाही तलवाडा येथील रहिवासी किसनाबाई करडे या आज देखील सिद्धार्थ नगर तलवाडा या ठिकाणी कच्च्या मातीच्या घरात रहात असून पावसाळ्यात त्यांचे घर नेहमी भीती पडत असतात त्यामुळे आता त्यांनी पत्राचे शेड मारले असून ग्रामपंचायतला वारंवार चक्र मारून देखील काही फायदा होत नसल्यामुळे त्यांनी खंत व्यक्त केली असून आजही त्या म्हणत असतात की, मला भैयासाहेबच घरकुल देतील मात्र अशा बटईच्या घरकुलामुळे असे अनेक किसनाबाई करडे सारखे खरे लाभार्थी वंचित असून याकडे मा आ अमरसिंह पंडित साहेबांनी स्वतः लक्ष घालून या माऊलीस रमाई घरकुल योजनेचा यावर्षी घरकुल योजना लाभ द्यावा अशी मागणी होत आहे

## भालगांव ग्रामस्थांनी भगवानगडाला दिली ७४ लाख रुपयांची देणगी

**करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन**

**प्रतिनिधी ।** बीड

श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू झालेल्या आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात.



श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे भालगांव (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले.

त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार संपूर्ण आकडेवारीची गोळाबेरीज ही ७४ लाख रुपये झाली.

नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. या भव्य दिव्य मंदिरासाठी लागणारा खर्च अंदाजे २६ कोटी रूपये इतका आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.




## ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे क्षयरोगींना धान्य वाटपाचा कार्यक्रम

बीड- क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम जिल्हा रुग्णालय बीड व ग्रामीण रुग्णालय माजलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने उपचार घेत असलेल्या क्षय रुग्णांना मोफत अन्न धान्य किटचे वाटप करण्यात आले. या वेळी एकूण अकरा लाभार्थ्यांना धन्य किटचे ग्रामीण रुग्णालयाच्या वतीने वाटप करण्यात आले. यावेळी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.विजय कट्टे, डॉ. बडे, डॉ. दबडगावकर डॉ. काळे, डॉ. रुद्रवार डॉ. मिनाक्षी साळुंखे, डॉ. शेजुळ, डॉ. वाघमारे यावेळी तालुका क्षयरोग सुपरवायजर अर्शद शेजुळ हे उपस्थित होते.

## चंपावती महोत्सवातील चित्रकला, रांगोळी स्पर्धेत जिल्हाभरातून हजारो बाल कलाकारांचा उस्पुर्त सहभाग!

**हजारो बाल कलाकारांनी रेखाटले खा.डॉ. श्रीकांत शिंदेचे आकर्षक चित्र**

**प्रतिनिधी ।** बीड

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १ फेब्रुवारी ते ९ फेब्रुवारी २०२४ यादरम्यान बीड शहरात आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले असून काल दि. १ फेब्रुवारी रोजी २०२४ रोजी बीड जिल्ह्यातील १०३ शाळांमधून हजारो बाल कलाकारांनी चित्रकला आणि रांगोळी स्पर्धेत उस्पुर्त सहभाग नोंदवला. चित्रकला स्पर्धेत वयोगट इयत्ता पाहिली ते तिसरी- फुलांची टोपली, वयोगट इयत्ता चौथी ते सहावी- राष्ट्रीय पक्षी मोर आणि वयोगट- इयत्ता सातवी ते दहावी मधील बाल कलाकारांना संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे यांचे चित्र काढण्यासाठी विषय दिले होते. कमालीची गोष्ट सर्व वयोगटातील बाल कलाकारांनी आकर्षक अशे चित्र काढून स्वतःच्या कलेचे दर्शन घडवले यादरम्यानच जिल्हाभरातील ७२ शाळांमध्ये समूह रांगोळी स्पर्धा पार पडली असून बाल कलाकारांनी एकत्रित येऊन शाळेच्या प्रांगणात माझ्या शाळेची ईमारत हा विषय घेऊन उभेउभ रांगोळी काढली. कौतुकाची गोष्ट म्हणजे बाल कलाकारांनी शाळेच्या प्रांगणात उभेउभ काढलेली शाळेच्या ईमारतीची रांगोळी पाहून शाळेचे संस्थाचालक, प्राचार्य तथा शिक्षक भावुक झाली कारण या रांगोळीतून विद्यार्थ्यांचे स्वतःच्या शाळेवर असलेले प्रेम दिसून आले. चित्रकला आणि रांगोळी स्पर्धा संपन्न होत असताना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक स्वप्नील गलधर आणि चंपावती महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कांबळे तथा अमोल गायकवाड, अनिकेत कांबळे, प्रबुद्ध कोरडे यांनी विविध शाळेत भेटी दिल्या. विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांचे अभिनंदन केले.

डॉ श्रीकांत शिंदेंनी मानले बीडच्या बाल कलाकारांचे आभार!

बीडमध्ये संपन्न होत असलेल्या आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकारंडकातील चित्रकला स्पर्धेत बीडच्या हजारो बाल कलाकारांनी संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे यांचे हुबेहूब आणि आकर्षक रेखाटल्याने खा. डॉ श्रीकांत शिंदे यांनी बीडमधील बाल कलाकारांचे कौतुक करत आभार मानले आहेत. याबरोबरच शिवसेना जिल्हाप्रमुख



अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक स्वप्नील गलधर यांनी देखील सर्व शाळांनी चित्रकला, आणि रांगोळी स्पर्धेत आपल्या कलेचा अविष्कार दाखवून खा. डॉ श्रीकांत शिंदे यांच्यावर आपल्या चित्रातून प्रेम व्यक्त केल्याबद्दल आभार मानले आहेत.

# शिदोड येथील जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न

## विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाचे कौशल्य बाल आनंद मेळाव्यातून मिळते- जेष्ठ विस्तार अधिकारी श्री माटे सर

**प्रतिनिधी** । बीड

शालेय विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान, नफा-तोटा, फायदा- नुकसान व हिशोबांचा ताळमेळ हे सर्व कौशल्य बाल आनंदमेळाव्यातून शिकण्यास मिळते त्यामुळे शालेय जीवनात बाल आनंद मेळावा हा विद्यार्थी जीवनात व्यवहार ज्ञान रुजवणारा व सक्षम विद्यार्थी बनविणारा प्रमुख भाग असल्याचे मत

गशिअ कार्यालय बीड येथील ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री माटे यांनी शिदोड येथील जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आलेल्या बाल आनंद मेळाव्याचे उद्घाटन करताना व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर कुर्ला केंद्राचे केंद्रप्रमुख श्री कांबळे सर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्षा श्रीम प्रतिक्षा प्रविण तोडकर, सरपंच श्री जयलिंग तोडकर, गावातील ज्येष्ठ नागरिक चंद्रसेन शेंडगे नाना, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री पवार सर, श्री महालक्ष्मी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री दत्तात्रय चव्हाण सर, श्री आत्माराम वाव्हळ सर, श्री गणेश गुजर सर, कुर्ला केंद्राचे केंद्रीय मुख्याध्यापक श्री गायकवाड सर, कुर्ला केंद्रातील शिक्षक श्री रणे सर, श्री पवळ सर श्री आठवले सर, श्री प्रल्हाद गिरी सर, गिरी सर, श्रीमती टेकाळे मॅडम, बागडे मॅडम,श्रीमती कुलकर्णी मॅडम श्रीमती कांबळे मॅडम,श्रीमती जोशी मॅडम,श्रीमती मस्के मॅडम, श्रीमती करांडे मॅडम व शिदोड शाळेतील मुख्याध्यापक श्री पवार सर, तसेच शिक्षक श्री अनवणे सर, श्री घोडके सर,श्री चिल्लेवाड सर, शिक्षिका श्रीमती गोरे मॅडम, श्रीमती भागडे मॅडम, श्रीमती नवसारे मॅडम, श्रीमती मस्के मॅडम आदी उपस्थित होते.

या बाबत अधिक माहिती अशी की शाळेतील विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानाचे कौशल्य माहित व्हावे व त्यांचा विकास व्हावा यासाठी प्रत्यक्ष व्यवहार कसा करावा याचे प्रात्यक्षिक देण्याच्या उद्देशाने बीड तालुक्यातील शिदोड येथील जिल्हा परिषद शाळेत शनिवार दिनांक १ फेब्रुवारी, २०२५ रोजी

निपुण भारत अंतर्गत, शाळेमध्ये माता पालक बैठक, हळदी कुंकू आणि बाल आनंद मेळावा (आनंदनगरी ) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे उद्घाटन जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी श्री माटे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर आलेल्या सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. स्वागतानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विस्तार अधिकारी श्री माटे सर म्हणाले की, शाळा हे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण शिक्षण देणारं केंद्र आहे. आपल्या जिल्ह्यातील सर्व शाळा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच तत्पर असतात. सर्व शाळेत शालेय अध्यापना बरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहशालेय उपक्रमांचे आयोजन केले जात आहेत. विद्यार्थ्यांना व्यवहारिक ज्ञान मिळावे यासाठी आज शनिवार दिनांक १ फेब्रुवारी रोजी आपल्या शिदोड जिल्हा परिषद शाळेत बाल आनंद मेळावा (आनंदनगरी ) आयोजित करून प्रत्यक्षात व्यवहार कसा करावा, बाजारात आपला माल



कसा विकावा याचा प्रत्यक्षात अनुभव या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. हा अनुभव त्यांच्या भावी जीवनात शिदोरी म्हणून कायम सोबत राहणार आहे. या मेळाव्यातून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान, नफा- तोटा, फायदा- नुकसान व हिशोबांचा ताळमेळ हे सर्व कौशल्य शिकण्यास मिळते. त्यामुळे अशा मेळाव्याचे प्रत्येक शाळेत आयोजन केले पाहिजे असे मत यावेळी श्री माटे सर यांनी व्यक्त केले. शिवाय सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या बाल आनंद मेळाव्यात या मेळाव्यात पहिली ते सातवीच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी भाग घेतला होता. विद्यार्थ्यांनी आपले पारंपारिक खाद्यपदार्थ आणले होते. शिवाय दैनंदिन जीवनात लागणाऱ्या वस्तूं विक्रीसाठी आणल्या होत्या. या मध्ये प्रामुख्याने सर्व मुला मुलींनी विविध खाण्याचे स्टॉल लावलेले होते. स्टॉलमध्ये मिसळ पाव, वडापाव, भेळ, मिसळपाव, पाणीपुरी, पॅटीस, लिंबू सरबत, कलिंगड, मंचुरियन, भाजी भाकरी, दही-धपाटे इत्यादी स्टॉल लावलेले होते. यामध्ये मुलांच्या चेहऱ्यावर हसू व आनंद दिसून आला. या आनंदमेळातून मुले व्यवहारिक ज्ञान, आनंद, गणितीय क्रिया, सहकार्य, एकमेकांना मदत, अशा निराळ्या प्रकारच्या बाबीची माहिती विद्यार्थ्यांनी घेतली.

आपण आणलेला माल लवकरात लवकर विकला जावा यासाठी मेळाव्यात स्टॉल लावलेले विद्यार्थी बाजारातील व्यापाऱ्या प्रमाणे मोठ्याने आवाज देऊन विद्यार्थी ग्राहकांना आपल्या स्टॉलकडे आकर्षित करत होते. या ठिकाणी होणारा आवाजाचा गलका पाहून आज शाळेत बाजार भरला की काय असे भासत होते. मेळावा यशस्वी करण्यासाठी शाळेचे सहशिक्षक विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# शिक्षक बी.बी.घुमरे यांचा सेवापुर्ती समारंभ संपन्न

**प्रतिनिधी** । बीड

येथील विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे गणित विषयाचे शिक्षक बी.बी.घुमरे हे दि.३१ जानेवारी २०२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा शाळेच्या वतीने सेवागौरव सोहळा आयोजीत करण्यात आला होता. विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पेठ बीड येथील सहशिक्षक बी.बी.घुमरे आणि वाघमारे एस.बी. हे दि.३१ जानेवारी २०२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा सेवागौरव सोहळा नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.जाधव एम.सी. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे कार्यवाहक राऊत एम.ए., विनायक प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका किर्तीताई पांगारकर, विनाताई भोज, मोहनराव सिरसाट, मुख्याध्यापक प्रदिप जगताप, अभिषेक राऊत, धनवंत मस्के, सुधाकर तांदळे, रावसाहेब भोसले. आदि



उपस्थित होते. यावेळी प्रथम मान्यवरांच्या हस्ते स्व.केशरकाकू क्षीरसागर व कर्मयोगी स्व.सोनाजीराव क्षीरसागर यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पन करण्यात आला. विनायक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने सर्वश्री घुमरे, वाघमारे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या प्रसंगी मान्यवरांनी दोन्ही सेवानिवृत्त शिक्षकांना पुढील भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.जाधव एम.सी. यांनी सर्वश्री घुमरे व वाघमारे यांनी केलेल्या कार्याची माहिती सांगितली. यावेळी उपमुख्याध्यापक रियाज बेग, पर्यवेक्षक सुहास अमरापुरकर, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रल्हाद नरवडे यांनी केले. शेवटी राजेंद्र गाडेकर

# च-हाटा रोडवरील पालवण फाटा रेल्वेपुल प्रकरणात कारवाईसाठी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना तक्रार

## रेल्वे आयुक्तांच्या दौऱ्यात रेल्वे पुलावरच आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

**प्रतिनिधी** । बीड

अहिल्यानगर -बीड- रेल्वे मार्गावरील बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने निरुपयोगी ठरला असुन मध्यंतरी पाडण्याचे काम सुरू होते. संबंधित प्रकरणात सखोल चौकशी करून जनतेच्या पैशाचा अपव्यय करणा-या संबंधित रेल्वे विभागाचे अभियंता आणि लोहमार्ग पुलाचे काम करणारी ठेकेदार कंपनी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करून नुकसान भरपाईची रक्कम शासन तिजोरीत जमा करण्यात यावी या प्रमुख मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे



लिंबागणेशकर , शेख युनुस, बीड जिल्हाध्यक्ष (इंटक)रामधन जमाले,शिवशर्मा शेलार, शेख मुबीन, शेख मुस्ताक, पांडुरंग हराळे यांनी निवासी जिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांच्या मार्फत केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा यांना लेखी निवेदन देऊन दि.०५ बुधवार रोजी रेल्वे पुलावरच धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा दिला आहे.

अहिल्यानगर - बीड -परळी रेल्वे मार्गावरील बीड तालुक्यातील च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील २ कोटी ७० लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेला पुल लोहमार्गाची व पुलाची दिशा यांचा अंदाज चुकल्याने पाडण्यात येत होता.आम्ही दि.२३.१२.२०२४ रोजी प्रशासनाला लेखी तक्रार केल्यानंतर आणि विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर पुल पाडण्याचे काम थांबविण्यात आले.यापुलासाठी जनतेच्या पैशाचा अपव्यय झाला असुन संबंधित प्रकरणात जबाबदार रेल्वे विभागाचे अभियंता आणि लोहमार्गावरील पुलाचे काम करणारी ठेकेदार कंपनी यांची सखोल चौकशी करून नुकसान भरपाई वसूल करून शासन दरबारी जमा करण्यात यावी.तसेच याठिकाणी लोहमार्ग ओलांडताना ग्रामस्थांचे हाल होत असुन आवश्यक उपाययोजना करण्यात यावी तसेच बीड तालुक्यातील नवगण राजुरी, बाभुळखुंटा आदी गावातील रेल्वे पुलांच्या खाली पावसाळ्यात गुडघाभर पाणी साचून नागरीकांना त्रास होतो त्यामुळे संबंधित प्रकरणात आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.अशी मागणी करण्यात आली आहे.

दि.०५.०२.२०२५ वार बुधवार रोजी राजुरी ते बीड या नविन रेल्वे लोहमार्गाची जलदगती चाचणी घेण्यात येणार आहे. रेल्वे सुरक्षा आयुक्त मनोज अरोरा रेल्वे प्रवाशांची सुरक्षा व सुविधांसाठी आवश्यक उपाययोजना या दृष्टीने राजुरी ते बीड रेल्वे स्थानका दरम्यानची तपासणी करणार असुन त्याच दिवशी दि.५ बुधवार रोजी च-हाटा रोडवरील पालवण फाटा येथील रेल्वे पुलावर धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन रेल्वे सुरक्षा आयुक्त यांना जिल्हाधिकारी बीड, पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्फत देण्यात आले आहे.



सौताडा येथे संजय नवले पाटील (जिल्हा परिषद सदस्य बीड) व विनोदशेठ नवले पाटील (संचालक कृ.उ.बा समिती जामखेड) यांच्या नवले पाटील मिल्क अँड ॲग्रो प्रॉडक्ट्स उद्घाटनप्रसंगी राहुल मोरे यांनी शुभेच्छा दिल्या. यावेळी शिक्षण महर्षी पी.एस. पवार सर,सरपंच भाऊसाहेब भराटे, सरपंच अभिषेक नवले पाटील, ऋषिकेश पवार, अनिल मुळीक आदी उपस्थित होते.

# देवीबाभुळगाव येथिल ग्रामपंचायत भवनचे मोठया थाटात उदघाटन

**प्रतिनिधी** । बीड

बीड तालुक्यातील देवी बाभुळगाव-चांदेगाव ग्रुप ग्रामपंचायतच्या भवनचे लोकार्पण सोहळा मोठया थाटात पार पडला ह.भ.प लक्ष्मण महाराज मेंगडे व लोकनेते डॉ.बाबुरावजी जोगदंड साहेब यांच्या शुभहस्ते या ग्रामपंचायत भवनचे उदघाटन करण्यात आले या लोकार्पण सोहळयास प्रमुख पाहणे म्हणुन सय्याजी(बप्पा)शिंदे,सरपंच प्रदीप जोगदंड,प्रशांत शिंदे,सुधीर नाईकवाडे,माजी सरपंच विलास भाऊ, माजी सरपंच रत्नाकर जोगदंड,माजी सरपंच सुमंत गुरव,दत्ता भोसले,ग्रामपंचायत सदस्य अमर जोगदंड,शिवाजी वाघमारे,राजेंद्र व्यवहारे, निवृत्ती आण्णा,गणेश(बापु)जोगदंड,महेश कदम, विलास घरत,संभाजी(आबा)जोगदंड, चेरमन उमेश जोगदंड,सचिन जोगदंड,विशाल जोगदंड,महेश



जोगदंड,सखाराम पाटील ,शिवाजी भासले,पंडित आबा,नेहरू(काका)जोगदंड यांच्यासह परिसरातील विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठया संख्येने उपस्थीत होते.

# जय हिंद कॅम्पस बीड च्या शालेय फन फेअर कार्यक्रमाचे जल्लोषपूर्ण वातावरणात उद्घाटन संपन्न

**प्रतिनिधी** । बीड

बीड शहरातील नामवंत जयहिंद कॅम्पसच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यातीलच भाग म्हणून शालेय विद्यार्थ्यांना व्यवसायाची आवड निर्माण व्हावी यासाठी शिका व कमवा ही संकल्पना लक्षात घेऊन फन फेअर या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ३१ जानेवारी २०२५ रोजी जय हिंद कॅम्पस मिल्लत नगर बीड येथे करण्यात आले होते सदरील फन फेअरचे उद्घाटन भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हा सरचिटणीस मा. सर्जेराव तात्या तांदळे साहेब यांच्या शुभहस्ते करण्यात आले यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पार्टी अल्पसंख्यांक मोर्चा



प्रदेश महामंत्री मा. सलीम जहांगीर साहेब, मराठा आरक्षण मोर्चा समन्वयक गोपाल जी धांडे साहेब, मदरसा इमाम रब्बानी चे संचालक मुफ्ती अन्वर साहेब, सलाम एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटीचे सफी अनवरी सर, समाजसेवक खय्युम इनामदार, आदी मान्यवर उपस्थित होते यावेळी सर्जेराव जी तांदळे साहेब यांनी आपले मनोगत व्यक्त करताना विद्यार्थ्यांना आपल्या शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षण घेण्याचे प्रतिपादन केले व चांगले गुण आत्मसात करण्यासंबंधी मार्गदर्शन केले यावेळी सलीम जहांगीर साहेब यांनी जय हिंद कॅम्पसची होत असलेली उत्तरोत्तर प्रगती संदर्भात कौतुक केले व विद्यार्थ्यांना चांगल्या शिक्षणाची संधी कॅम्पसच्या निमित्ताने या भागामध्ये उपलब्ध करून दिल्याबद्दल संस्थेचे सचिव शेख निजाम यांचे अभिनंदन केले आलेल्या सर्व मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीने बनवून आणलेल्या विविध स्वादिष्ट पदार्थांचा आस्वाद घेतला व त्यांचे तोंड भरून कौतुक केले आलेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत व आभार जय हिंद कॅम्पस चे सचिव शेख निजाम यांनी केले यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी पालक उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जय हिंद एज्युकेशन कॅम्पसच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले



**प्रतिनिधी** । माजलगांव

गोवा येथे आयोजित ऑल इंडिया कराटे अँन्ड मार्शल आर्ट्स तर्फे आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय कराटे चॅम्पियनशीप स्पर्धेत अँड प्रमोद यांचा मुलगा जयसिंग तौर हा प्रथम रँक मधून प्रतिस्पर्धी खेळाडूस पराभूत करून सुवर्णपदक व विजयी ट्रॉफीचा मानकरी ठरलेला असून त्याने विजयीश्री खेचून आणलेली आहे. सुवर्णपदक व विजयी ट्रॉफी प्राप्त केल्या बद्दल त्याचे प्रशिक्षक चंद्रमणी डोंगरे , सार्थक डोंगरे सर, अभिजित राठोड सर माजलगाव , मतदारसंघाचे आमदार प्रकाश दादा सोळंके, लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी कारखान्याचे चेअरमन विरेंद्र दादा सोळंके, जयसिंग भैय्या सोळंके, अँड भानुदासराव डक , नितीन जाधव, क्षितीज गायकवाड, आदींनी अभिनंदन करुन माजलगाव सह बीड जिल्ह्याचे नाव आंतरराष्ट्रीय स्पर्धेत स्पर्धेत लौकिक करुन सुवर्णपदक मिळवल्या बद्दल मनःपूर्वक अभिनंदन केले व पुढील यशस्वी वाटचालीस शुभेच्छा दिल्या, जयसिंग तौर याचे सामाजिक व राजकीय स्तरातून सर्वत्र कौतुक केले जात आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT